| MHOS090021652022 | दाखल दिनांक | :- | २९/०८/२०२२ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २९/०८/२०२२ | | |
| | निकाल दिनांक | :- | २८/०७/२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०३ | १० | २९ |

**<u>भाग अ</u>**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(i) अन्वये]**

**<u>न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, (न्यायालय क्र.३) कळंब, ता. कळंब,</u>**

**<u>जि. धाराशिव यांचे न्यायालयात</u>**

**(पीठासीन अधिकारी - अमृता धोंडीराम जाधव)**

न्यायनिर्णय घोषित दिनांक : २८/०७/२०२६

| | |
|---|---|
| सं. फौजदारी खटला क्र. ४७८/२०२२ | निशाणी क्र. ३६ |
| गुन्हा नोंदणी क्रमांक – १३४/२०२२ | |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे ठाणे अंमलदार,<br>पोलीस स्टेशन, कळंब,<br>ता.कळंब, जि. धाराशिव. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्री. एस. टी. वैद्य |
| **<u>विरुध्द</u>** | |
| आरोपी | सोमनाथ युवराज क्षिरसागर,<br>वय ४३ वर्षे,<br>रा. पापडे गल्ली, कळंब,<br>ता.कळंब, जि .धाराशिव. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. एम.के. मुळीक |

## भाग ब

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २१/०३/२०२२ |
| गुन्हा दाखल दिनांक | २१/०३/२०२२ |
| दोषारोप दाखल दिनांक | २९/०८/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०५/०३/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १३/०३/२०२५ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | २८/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २८/०७/२०२६ |
| दोषी ठरवल्याचा दिनांक, जर असल्यास | -निरंक- |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| -- | सोमनाथ युवराज क्षिरसागर | १३/०५/२२ | १३/०५/२२२ रोजी आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१ (१)(अ) प्रमाणे नोटीस दिली. | भा.द.वि. चे कलम १८८, २७२ आणि २७३ | निर्दोष | -निरंक- | -निरंक- |

## भाग क

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(iii) अन्वये]

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

## अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | गजानन मधुसुदन जाधव | जप्ती व घटनास्थळ पंच | १६ |
| २. | महेबुब समदाणी पठाण | जप्ती व घटनास्थळ पंच | २० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | किरण प्रभाकर अंबोरे | फिर्यादी | ३१ |

## ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

## अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | अंतिम अहवाल |
| २. | २ | मुद्देमाल यादी |
| ३. | ३ | फेरीस्त |
| ४. | १७ | पंचनाम्यावरील सहीस ओळखीपुरते. |
| ५. | २१ | जप्ती व घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीस ओळखीपुरते. |
| ६. | २२ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीस ओळखीपुरते. |

## ब. आरोपीतर्फे पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## क. न्यायालयीन पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | -- | १. प्रिमीअम राज निवास सुगंधीत पान मसाल्याचे एकुण २५ पाकीटे किंमत रक्कम रु.४,८००/-.<br>२. रॉयल २२० तंबाखुचे एकुण ४० पाकीटे किंमत रक्कम रु.२,६००/-.<br>३. प्रिमीअम एवस एल-०१ जाफरानी जर्दा एकुण ४० पाकीटं किंमत रक्कम रु.१,९२०/-.<br>४. करमचंद प्रिमीअम पान मसाल्याचे एकुण ५ पाकीटे किंमत रक्कम रु.८००/-.<br>५. के.सी.-१००० जाफरानी जर्दा एकुण २१ पाकीटे किंमत रक्कम रु.८४०/-.<br>६. विमल पान मसाला एकुण २१ पाकीटे किंमत रक्कम रु.२,५४०/-.<br>७. व्ही-१ तंबाखु एकुण ३९ पाकीटे किंमत रक्कम रु.१,१७०/-.<br>८. एक्का प्रिमीअम एकुण ३ पाकीटे किंमत रक्कम रु.६००/-.<br>९. गोवा १००० एकुण ३ पाकीटे किंमत रक्कम रु.२३०/-.<br>१०. एम सेंटेड तंबाखु एकुण २ पाकीटे किंमत रक्कम रु.६००/-.<br>११. केसरयुक्त विमल पान मसाला एकुण १० पाकीटे किंमत रक्कम रु.२८०/-. |

**<u>गुन्हाः</u>**- भारतीय दंड विधानाचे कलम १८८, २७२ व २७३ अन्वये.

## <u>न्यायनिर्णय</u>

(जाहीर दिनांक – २८ जुलै, २०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम १८८, २७२ व २७३ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

**<u>सरकार पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-</u>**

**२.** फिर्यादी, किरण प्रभाकर आंभोरे, पो.कॉ./१८१२, पोलीस ठाणे, कळंब संलग्न उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कळंब यांनी दिनांक २४/०४/२०२२ रोजी पोलीस ठाणे, कळंब येथे अशी फिर्याद दिली की, दिनांक २१/०३/२०२२ रोजी १२.०० वा. वरिष्ठांच्या आदेशानुसार ते व त्यांच्यासोबत एम रमेश, सहा. पोलीस

अधिक्षक, पो.उप.नि. पुजरवाड, स.पो.फौ./३०० कराडे, पो.ना./१३४० सांगळे, पो.ना./१५३४ शेख, पो.कॉ./१८७५, म.पो.ना./१५८१ कांबळे, म.पो.कॉ./७५४ ओव्हाळ आणि चा.पो.हे.कॉ./१८८५ कानवटे असे खाजगी वान व सरकारी गाडी क्रमांक एम.एच.२५/सी.६४९६ असे कळंब शहरात अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकामी पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कळंब शहरात पापडे गल्ली, कळंब येथे आरोपीच्या दुकानात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा व तंबाखु चोरटा विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने ठेवली आहे. त्यावरुन त्यांच्या वरिष्ठांनी दोन पंचांना बोलावुन घेऊन पंचांसह बातमीच्या ठिकाणी अचानकपणे १३.०० वा. छापा मारला असता त्यांना पाहुन एक इसम दुस-या दरवाज्यातुन पळुन गेला. त्यांनी दुकानाची झडती घेतली असता त्यांना एकुण रक्कम रु.१६,८२०/- किंमतीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, तंबाखु व सुगंधीत पान मसाला मिळुन आला. त्यानंतर तेथे घरातुन एक महिला दुकानात आली. त्यांनी तिचे नाव व दुकानातुन पळालेलया इसमाचे नाव विचारले असता तिने तिचे नाव वैशाली सोमनाथ क्षिरसागर असे सांगुन पळालेल्या इसमाचे नाव सोमनाथ युवराज क्षिरसागर असे असुन तो तिचा पती असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी दोन पंचांसमक्ष सविस्तर जप्ती पंचनामा करुन जप्त करुन सदरचा मुद्देमाल उप.वि.पो.अ., कार्यालय, कळंब येथे आणला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द वरील आशयाची फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन पोलीस स्टेशन, कळंब येथे गुन्हा र. क्र. १३४/२०२२ भारतीय दंड विधानाचे कलम १८८, २७२ व २७३ प्रमाणे गुन्हा नोंद झाला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. जी.पी. पिलंगवाड यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तसेच तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीवर भारतीय दंड विधानाचे कलम १८८, २७२ व २७३ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीला निशाणी क्र.१३ वर दोषारोपाचा तपशील समजावून सांगितला. वरील निवेदनाप्रमाणे त्याने गुन्हा कबुल न करता प्रकरण चालविण्याचे

स्विकारले.

५. सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी तीन साक्षीदारांना तपासण्यात आले. त्यानंतर निशाणी क्र.१ खालील आदेशानुसार सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन निशाणी क्रमांक ३५ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपीच्या वतीने कोणताही पुरावा दाखल करण्यात आला नाही.

६. सरकार पक्षाची कथने व आरोपीचा बचाव पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांचे निष्कर्ष त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणेः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २१/०३/२०२२ रोजी १३.०० वा. सुमारास कळंब शहरात पापडे गल्ली, कळंब येथे आरोपी हा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला रक्कम रु.१६,८२०/- किंमतीचा सुंगधीत पान मसाला, गुटखा व तंबाखु स्वत:च्या कब्जात बाळगल्याच्या अवस्थेत मिळून आला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही |
| २. | उक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने खाद्यपदार्थांमध्ये विक्रीच्या उद्देशाने भेसळ करुन ते हानीकारक असल्याचे माहीत असताना देखील त्याची विक्री करत असताना मिळुन आला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ३. | उक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी हा खाण्यापिण्यास अयोग्य तसेच, आरोग्यास हानिकारक असलेल्या पदार्थांची माहीत असताना देखील जाणूनबुजून विक्री करत असताना | नाही |

| | | |
|---|---|---|
| | मिळुन आला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| ४. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ साठीः-**

**७.** आरोपीतर्फे विधिज्ञ व सरकार पक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी गुणदोषावर न्यायनिर्णय करणेबाबत युक्तीवाद केला.

**८.** सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी तीन साक्षीदारास तपासण्यात आले. गजानन मधुसुदन जाधव (अ.सा.क्र.१, निशाणी क्रमां १६) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, त्यांना दिनांक २१/०३/२०२२ रोजी पोलीसांनी पोलीस स्टेशन, कळंब येथे बोलाविले होते. पोलीस स्टेशन, कळंब येथे पोलीसांनी त्यांच्या को-या कागदावरती सह्या घेतल्या. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान पंचनाम्यावर त्यांची सही असलयाचे मान्य केले. परंतु, मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे.

**९.** सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास समर्थन न दिल्यामुळे अभियोग पक्षातर्फे न्यायालयाच्या परवानगीने त्याचा उलटतपास नोंदविण्यात आला. तरीदेखील, सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास कोणतेही समर्थन अथवा कबुली दिलेली नाही.

**१०.** महेबुब समदाणी पठाण (अ.सा.क्र.२, निशाणी क्रमांक २०) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, त्यांना दिनांक २१/०३/२०२२ रोजी पोलीसांनी जप्ती पंचनाम्याकरीता व दिनांक २६/०४/२०२२ रोजी घटनास्थळ पंचनाम्याकरीता बोलावले नव्हते. ते त्यांच्या वैयक्तीक कामाकरीता पोलीस स्टेशन,

कळंब येथे गेले असता पोलीसांनी त्यांच्या जप्ती व घटनास्थळ पंचनाम्यावरती सह्या घेतल्या. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान जप्ती व घटनास्थळ पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु, मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे.

११. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास समर्थन न दिल्यामुळे अभियोग पक्षातर्फे न्यायालयाच्या परवानगीने त्याचा उलटतपास नोंदविण्यात आला. तरीदेखील, सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास कोणतेही समर्थन अथवा कबुली दिलेली नाही.

१२. किरण प्रभाकर अंबोरे (अ.सा.क्र.३, निशाणी क्रमांक ३१) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक २१/०३/२०२२ रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय येथे पोलिस शिपाई म्हणून त्यांची नेमणूक होती. ते कर्तव्यावर हजर असताना सहा. पोलिस अधिक्षक एम. रमेश यांच्या आदेशावरून अवैध धंद्यावरती कार्यवाही करण्याकरिता कळंब शहरात बारा वाजता रवाना झाले. त्यांच्यासोबत सहा. पोलिस अधिक्षक एम. रमेश, स.पो.फौ. ३०० कराळे, एस. सी. १३४० सांगळे, पी.एन. १५३४, सादीक, पी.सी. १८७५ मंदे, महिला पो.हे.का. १३८० कांबळे, म.पो.कॉ. ओव्हाळ व गाडीचालक असे खाजगी व शासकीय वाहनाने कळंब शहरातील पापडे गल्ली येथे गेले असता त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एका किराणा दुकानात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा याची विक्री होत आहे, अशी माहिती मिळताच एम. रमेश साहेब यांनी पो.उप.नि. पुजरवाड यांना फोन करून दोन शासकीय पंच घेवून येण्याबाबत सांगितले. त्यानंतर पंच आल्यानंतर त्यांनी दुकानात जात असताना पंचांसमक्ष दुकानात १३:०० वाजता छापा मारला. दुकानात वेगवेगळया कंपनीचे गुटखा असणारे पॉकेट, गोवा, विमल अशा प्रतिबंधक असलेले एकूण १६,८२०/- रूपयाचा मुद्देमाल मिळून आला. सदरचे दुकान हे सोमनाथ युवराज क्षिरसागर यांचे होते. पंचांसमक्ष मुद्देमालाचा पंचनामा हा पी.एस.आय. पुजरवाड

यांनी केला. त्यानंतर सदरचा मुद्देमाल जप्त करून पोलिस स्टेशन येथे आणला. त्यानंतर सदरचा मुद्देमाल गुटखा आहे किंवा नाही हे ओळखण्याकरिता अन्न व औषध प्रशासन उस्मानाबाद यांचेकडे पत्र दिले. दिनांक २४/०३/२०२२ रोजी त्यांनी आरोपीविरोधात फिर्याद दिली. त्यांना त्यांच्या पुराव्यादरम्यान अभिलेखावरील फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर त्यांची सही असुन, त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान आरोपीस ओळखले.

**१३**. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, दिनांक २१/०३/२०२२ रोजी अवैध धंद्याच्या केसेसवर कार्यवाही करणेकरीता पेट्रोलिंग कामी ज्या खाजगी वाहनाने ते गेले त्याचा क्रमांक सांगता येणार नाही. त्यांनी ज्या दुकानावर छापा मारला, त्या दुकानाचा परवाना पाहिला नव्हता. आरोपी त्या दुकानात हजर होता व त्यांना पाहून तो पळून गेला. प्रथम खबर अहवाल हा दिनांक २४/०४/२०२२ रोजीचा असून त्यावर त्यांची सही आहे. घटनास्थळी जप्त केलेला मुद्येमाल हा सात ते आठ कंपनीचा होता. मुद्येमालाचे निश्चित असे वर्णन म्हणजेच कंपनी व त्याचे एकूण नग याबाबत त्यांना सांगता येणार नाही. उर्वरीत उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

**१४.** प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपी हा बेकायदेशीररित्या भेसळयुक्त तसेच, खाण्या पिण्यास अयोग्य आणि हानिकारक असलेला महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला सुगंधीत पानमसाला, गुटखा व तंबाखु विक्री करण्याच्या उद्देशाने स्वत:च्या कब्जात बाळगल्याच्या अवस्थेत मिळुन आला हे निःसंशयपणे सिध्द करणे आवश्यक आहे. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी किरण अंबोरे यांनी आपल्या पुराव्यादरम्यान फिर्याद निशाणी क्रमांक ३२ सिध्द केली असली तरी त्यांच्या कथनास त्रयस्थ साक्षीदार दोन्ही पंच साक्षीदारांनी दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे

संशय निर्माण होत आहे. तसेच, दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास समर्थन न दिल्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त केल्याची बाब संशयापलीकडे सिध्द करणेकामी अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. तसेच, पुरेशी संधी देवुन देखील अभियोग पक्ष इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्याकामी अपयशी ठरला आहे.

**१५.** प्रस्तुत प्रकरणामध्ये अन्न विश्लेषक अधिकारी यांचा जप्त मुद्देमाल हा प्रतिबंधीत आणि मानवी आरोग्यास अपायकारक असल्याबाबतचा अहवाल दाखल नाही. त्यामुळे संशय निर्माण होत आहे. अभियोग पक्षाने तपासलेल्या स्वतंत्र पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा न दिल्यामुळे कथीत जप्त मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आणण्यात आणि जप्ती पंचनामा सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे व त्यामुळे आरोपीविरूध्दचा दोषारोप संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. म्हणून मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ साठीः-**

**१६.** एकंदर, मुद्दा क्र.१ ते ३ वरील कारणमिमांसा व निष्कर्ष बघता अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द केले नसल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१) आरोपी सोमनाथ युवराज क्षिरसागर, वय ४३ वर्षे, रा. पापडे गल्ली, कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम १८८, २७२ व २७३ अन्वयेच्या दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा जामीनमुचलका रद्द करण्यात येतो.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकामी रक्कम रुपये १५,०००/- चा वैयक्तिक जातमुचलका दाखल करावा.

४) प्रकरणात जप्त मुद्देमाल पावती (नि.क्र.२) मध्ये वर्णन केलेला मुद्देमाल हा यापुर्वीच अन्न व औषध प्रशासन विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे, अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदरच्या मुद्देमालाची कायद्यास अधीन राहुन योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

**स्वाक्षरीत/-**

**ठिकाण** - कळंब
**दिनांक** - २८/०७/२०२६

**( अमृता धोंडीराम जाधव)**
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
(न्यायालय क्र.३),कळंब.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | -- | Prashant Sunita S. Ovhal, Stenographer (Grade-III) |
| Name of the Court | -- | In the Court of 3rd Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C. Kallam. |
| Date of dictation | -- | 28/07/2026. |
| Order signed by the Presiding Officer on | -- | 28/07/2026. |
| Order uploaded on | -- | 28/07/2026. |